# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक १/०६/२०२३ चे ठराव**

---

**ठराव क्रमांक -३३४** — **विषय क्रमांक –३३४**

**दिनांक- १/०६/२०२३** — **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३३४**<br>**दिनांक-१/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. साप्रवि/२/कावि/३०९/२०२३दिनांक ३१/०५/२०२३ अन्वये**,** आरोग्य वैद्यकीय अधिकारी' पदावरील पदोन्नतीस मान्यतेबाबत. |
| **ठराव क्र. ३३४**<br>**दिनांक-१/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. साप्रवि/२/कावि/३०९/२०२३दिनांक ३१/०५/२०२३ अन्वये**,** पिंपरी चिंचवडमहानगरपालिका आस्थापनेवर **'आरोग्य वैद्यकीय अधिकारी'** अभिनामाचे१ पद **पे.लेवल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२००**मध्ये शासन मंजूर आहे. **'आरोग्य वैद्यकीय अधिकारी'** अभिनामाचे रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक १९/०५/२०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली होती.<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार **आरोग्य वैद्यकीय अधिकारी** या निकटतम निम्न पदावरील शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता इ. सेवाविषयक तपशील पडताळून शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ मधील मार्गदर्शक तरतुदींनुसार खालील अधिकारी यांना मागासवर्गीयांचे पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात न्यायप्रविष्ट विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णय तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने **'आरोग्य वैद्यकीय अधिकारी'** अभिनामाचे रिक्त होणारे पदावर (डॉ.पवन साळवे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे दि.३१ मे, २०२३ रोजी सेवानिवृत्तीमुळे) पे.लेवल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२०० मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे. |

<table>
<tr><td></td><td>
<table>
<tr><td>अ.क्र</td><td>ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदाची दिनांक ०१/०१/२०२२ रोजीची अंतिम सेवाज्येष्ठता यादीतील क्रम</td><td>अधिकारी नावं व पदनाम</td><td>पदोन्नतीचा प्रवर्ग</td></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td></tr>
<tr><td>१</td><td>९</td><td>डॉ.गोफणे लक्ष्मण पांडूरंग,<br><br>सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी</td><td>ज्येष्ठतेनुसार</td></tr>
</table>
महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित आहे. त्यानुसार सदरच्या विषयास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.
</td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**ठराव क्रमांक-३३५** **विषय क्रमांक –३३५**

**दिनांक- १/०६/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३३५**<br>**दिनांक-१/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. साप्रवि/२/कावि/३१०/२०२३ दि.३१/०५/२०२३ अन्वये, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावरील पदोन्नतीस मान्यतेबाबत. |
| **ठराव क्र. ३३५**<br>**दिनांक-१/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. साप्रवि/२/कावि/३१०/२०२३ दि.३१/०५/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवडमहानगरपालिका आस्थापनेवर **‘कार्यकारी अभियंता (स्थापत्य)’** अभिनामाचे२४ पदे **पे.लेवल S-२३वेतनश्रेणी ६७७००-२०८७००** मध्ये शासन मंजूर आहे. **‘कार्यकारी अभियंता (स्थापत्य)’**अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक १९/०५/२०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली होती.<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार **‘कार्यकारी अभियंता (स्थापत्य)’**या निकटतम निम्न पदावरील शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता इ. सेवाविषयक तपशील पडताळून शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ |

मधील मार्गदर्शक तरतुदींनुसार तसेच स्थापत्य अभियंता संवर्गातील सेवाज्येष्ठता व पदोन्नती संदर्भात न्यायप्रविष्ठ असलेल्या सर्व याचिकांमधील अंतिम निर्णयास अधिन राहून खालील अधिकारी यांना मागासवर्गीयांचे पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्या संदर्भात न्यायप्रविष्ट विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णय तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने **'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)'** अभिनामाचे रिक्तपदांवर **पे.लेवल S-२३वेतनश्रेणी ६७७००-** २०८७००मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| अ.क्र | दि.३१/१२/२००७ रोजीच्या सेवाज्येष्ठता यादीतील क्रम दिनांक २५/०५/२००४ रोजीची स्थिती गृहित धरुन विचारात घेतलेला क्रमांक | उपअभियंता पदावरील अधिका-यांचे नावं | पदवी/पदवीका बिंदू निहाय क्रम | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | **5** | पाठक अनघा अविनाश | पदवी | ज्येष्ठतेनुसार |
| २ | **7** | जावरानी मनोहर टेकचंद | पदवी | ज्येष्ठतेनुसार |
| ३ | **9** | वाघ संध्या नितीन | पदवी | ज्येष्ठतेनुसार |
| ४ | **11** | जावळे राजेंद्र कुंडलिक | पदवी | ज्येष्ठतेनुसार |
| ५ | **12** | ओहोळ विनय भाऊसाहेब | पदवी | ज्येष्ठतेनुसार |
| ६ | **14** | मोमीन जाहिरा इस्माईल | पदवी | ज्येष्ठतेनुसार |
| ७ | **15** | तुपसाखरे संजय अनंत | पदवी | ज्येष्ठतेनुसार |
| ८ | **17** | निंबाळकर नितीन रामचंद्र | पदवी | ज्येष्ठतेनुसार |
| ९ | उपअभियंता पदावर पदोन्नती झाल्याने नाव नाही | रामगुडे दत्तात्रय एकनाथ | पदविका | ज्येष्ठतेनुसार |
| १० | **9** | शिंदे हनुमंत सगनराव | पदविका | ज्येष्ठतेनुसार |
| ११ | **10** | शिंदे राजेंद्र विष्णू | पदविका | ज्येष्ठतेनुसार |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित आहे. त्यानुसार सदरच्या विषयास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**ठराव क्रमांक -३३६** | **विषय क्रमांक –३३६**

**दिनांक- १/०६/२०२३** | **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३३६**<br>**दिनांक-१/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.पापु/जशुके/कावि/३२५/२०२३ दि.१/६/२०२३ अन्वये, "जलशुध्दीकरण केंद्र, से. २३ मधील क्लोरिनेटर्सची सुधारणा करून त्यांची क्षमता वाढविणे" याकामांतर्गत विस्फोटक (PESO,Mumbai) विभागाचा परवाना मिळविणेसाठी टप्पा क्र.१,२ (Location-1) जुन्या क्लोरीन टनर शेड ठिकाणी नवीन २४ क्लोरीन टनर शेड बांधणे करीता जुने बांधकाम निष्कासीत करणे बाबत. |
| **ठराव क्र. ३३६**<br>**दिनांक-१/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.पापु/जशुके/कावि/३२५/२०२३ दि.१/६/२०२३ अन्वये, जलशुध्दीकरण केंद्र टप्पा क्र. १ चे क्लोरिन शेड सन १९८८ मध्ये बांधणेत आले आहे. सदरचे शेड बांधून अंदाजे ३५ वर्ष पुर्ण झाले आहेत. सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या बांधकामाचा निम्मा भाग मोडकळीस आलेला आहे. सदर बांधकामाचे Structural Audit करण्याबाबत कामाचे ठेकेदार मे. अवनीश एन्टरप्रायजेस यांना कळविले आहे त्या अनुषंगाने कामाचे ठेकेदार यांनी टप्पा क्र. १ चे क्लोरिन हाऊसचे Structural Visual Audit Reportया विभागास दि. १२/०५/२०२३ चे पत्रान्वये सादर केला आहे Structural Visual Audit Report प्रमाणे क्लोरिन हाऊस टप्पा क्र. १ ची इमारत "The overall condition of the building on the date of inspection is "Not Good" असा रिपोर्ट या विभागास सादर केला आहे. त्या अनुषंगाने सद्यस्थितीत सदर विभागास विस्फोटक विभाग, मुंबई यांचे कडील मंजूर नकाशा प्रमाणे नवीन क्लोरिन टनर शेड बांधणेचे काम करावयाचे आहे. तसेच सदर ठिकाणी Renovation करुन नवीन शेड करणे शक्य नाही त्यामुळे टप्पा क्र. १ चे क्लोरिन टनर शेड निष्कासीत करुन सदर ठिकाणी विस्फोटक विभाग, मुंबई यांचे कडील मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम करावयाचे आहे. त्यामुळे सदरचा विषय मा. महापालिका सभेमध्ये ठेवावयाचा आहे. से.क्र. २३ निगडी येथे मनपाचे जलशुध्दीकरण केंद्र आहे. सदर जलशुध्दीकरण केंद्र टप्पा क्र. १,२,३ आणि ४ यामध्ये विभागले गेले आहे. जलशुध्दीकरण केंद्र टप्पा क्र. १,२ आणि ३,४ अनुक्रमे सन १९८९, सन १९९८, सन २००७ मध्ये बांधणेत आले आहे. या विभागाकडून उपरोक्त विषयांकित कामामध्ये औद्योगिक व विस्फोटक विभागाचा परवाना घेणेची कार्यवाही चालु आहे. विषयांकित कामामध्ये क्लोरिन टनर साठवणे, सांभाळणे व वापरणे या करीता जलशुध्दीकरण केंद्राच्या आवारात टप्पा क्र. १,२ ( Location no 1 ) साठी आणि टप्पा ३,४ ( Location no 2)साठी असे प्रत्येकी १ क्लोरिन शेड म्हणजेच एकूण २ क्लोरिन शेड बनवण्याचे नियोजन आहे. प्रत्येक क्लोरिन शेड मध्ये २४ क्लोरिन टनर ( १ क्लोरिन टनर चे वजन १५०० कि.ग्रॅ, रिकामे वजन ६०० कि.ग्रॅ., क्लोरिन गॅस चे वजन ९०० कि.ग्रॅ.) ठेवणेचे अंतिम झाले आहे. त्या अनुषंगाने या विभागाकडून क्लोरिन टनर मान्यतेसाठी विस्फोटक विभाग, मुंबई यांना अर्ज तसेच, जागेचा नकाशा, शेडचा नकाशा ऑनलाईन पध्दतीने अर्ज क्र. OIN 1338315,दि. १२/०४/२०२३ अन्वये सादर केला आहे. तद्नंतर या विभागास विस्फोटक विभाग, मुंबई यांचे कडून ऑनलाईन जनरेट झालेले पत्र क्र.A/G/WC/MH/06/4869(G114229) दि. २५/०४/२०२३ अन्वये प्राप्त झाले आहे. |

सद्यस्थितीत टप्पा क्र. १,२ आणि ३,४ या साठी प्रत्येकी १ क्लोरिन शेड म्हणजेच एकूण ३ क्लोरिन शेड आहेत. नवीन विस्फोटक विभाग, मुंबई यांच्या मंजुरी नुसार टप्पा क्र. १ आणि २ साठी एकत्रित १ क्लोरिन शेड बनविणेचे आहे. त्यामुळे भविष्यात क्लोरिन मशीन यंत्रणा, मजुर वर्ग, दुरुस्ती, सुपरविजन इ. बाबींचे प्रमाण कमी होणार आहे. सद्यस्थितीत टप्पा क्र. १ च्या क्लोरिन शेड ची साईज २३.८० मी. X८.८० मी. एवढी आहे. टप्पा क्र. २ च्या क्लोरिन शेड ची साईज १८.१० मी. X ५.५५ मी एवढी आहे. विस्फोटक विभाग, मुंबई यांचे कडील मंजुर नकाशा नुसार क्लोरिन शेडची साईज २७ मी. X १० मी. अशी आहे. या विभागाचे असे नियोजन आहे की टप्पा क्र. १ चे क्लोरिन शेड सन १९८८ मध्ये बांधणेत आलेले आहे. सदरचे शेड बांधून अंदाजे ३५ वर्ष पुर्ण झाले आहेत. सदर ठिकाणी विस्फोटक विभाग, मुंबई यांचे कडील नकाशा प्रमाणे काम करणेस जागा उपलब्ध होऊ शकते तसेच सदर बांधकामाचा निम्मा भाग मोडकळीस आलेला आहे.

सदर बांधकामाचे Structural Audit करण्याबाबत कामाचे ठेकेदार मे. अवनीश एन्टरप्रायजेस यांना कळविले आहे त्या अनुषंगाने कामाचे ठेकेदार यांनी टप्पा क्र. १ चे क्लोरिन हाऊसचे Structural Visual Audit Reportया विभागास दि. १२/०५/२०२३ चे पत्रान्वये सादर केला आहे Structural Visual Audit Report प्रमाणे क्लोरिन हाऊस टप्पा क्र. १ ची इमारत “The overall condition of the building on the date of inspection is “Not Good” असा रिपोर्ट या विभागास सादर केला आहे.या अनुषंगाने विस्फोटक विभाग, मुंबई यांचेकडून मान्यता प्राप्त नकाशा प्रत, अस्तित्वात असलेल्या शेड मध्ये Renovation करुन सदर ठिकाणी नवीन शेड करता येणे शक्य नाही इ. बाबी ध्यानात घेता जलशुध्दीकरण केंद्र टप्पा क्र. १ साठी सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या क्लोरिन टनर आर.सी.सी. शेडचे संपुर्ण बांधकाम निष्कासीत करुन त्या ठिकाणी विस्फोटक विभाग, मुंबई यांचे कडील मान्यता प्राप्त नकाशा नुसार काम करणे योग्य राहील त्यामुळे टप्पा क्र. १ आणि २ याचे एकत्रित क्लोरिन शेड टप्पा क्र. १ च्या जागेत बांधणे नकाशाप्रमाणे योग्य राहील तसेच नकाशाप्रमाणे स्थळाची जागा टप्पा क्र. १ च्या जागेत दिली आहे.

जलशुध्दीकरण केंद्र टप्पा क्र. १ च्या जागेत क्लोरिन शेड विस्फोटक विभाग, मुंबई यांच्या नकाशा प्रमाणे म्हणजेच साईज प्रमाणे करावयाचे असल्याने सद्यस्थितीत अस्तित्वात असलेले टप्पा क्र.१ चे क्लोरिन शेड काढावे लागणार आहे.

तरी वरील सर्व बाबींचा विचार करता म्हणजेच टप्पा क्र. १ चे बांधकाम १९८८ चे आहे, सदर बांधकामास ३५ वर्ष पुर्ण झाले आहे, टप्पा क्र. १ च्या आर.सी.सी. बांधकामाचा निम्मा भाग मोडकळीस आलेला आहे, ठेकेदाराने सादर केलेला Structural Audit चा अहवाल, विस्फोटक विभाग, मुंबई यांचे कडून मान्यता प्राप्त नकाशे, अस्तित्वात असलेल्या शेडमध्ये Renovation करुन सदर ठिकाणी नविन शेड करता येणे शक्य नाही इ. बाबी ध्यानात घेता जलशुध्दीकरण केंद्र टप्पा क्र. १ साठी सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या

| | |
|---|---|
| | क्लोरिन टनर आर.सी.सी शेडचे संपुर्ण बांधकाम निष्कासित करुन त्या ठिकाणी विस्फोटक विभाग, मुंबई यांचेकडील मान्यता प्राप्त नकाशा प्रती नुसार काम करणे योग्य राहील. परंतु सदरचे बांधकाम निष्कासीत करणेसाठी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**ठराव क्रमांक -३३७** **विषय क्रमांक –३३७**

**दिनांक- १/०६/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३३७<br>दिनांक-१/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. बक्षेका/स्था/०५/१०९/२०२३ दि.१/६/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयामधील स्थापत्य विषयक व अनुषंगिक कामे करणे या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| **ठराव क्र. ३३७<br>दिनांक-१/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. बक्षेका/स्था/०५/१०९/२०२३ दि.१/६/२०२३ अन्वये, "पिंपरी चिंचवड महानगरपालिका ब क्षेत्रिय कार्यालयांतर्गत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय अस्तित्वात आहे. सदर मूळ इमारत मनपा शाळेची असून पोलिस आयुक्तालय कार्यालयाकरिता भाडेतत्वावर देणेत आलेली आहे. मा. पोलिस आयुक्त यांचेकडील दि. २१/४/२०२३ च्यापत्रान्वये सदर इमारती मध्ये असलेली जागा अपूरी असल्याने इमारतीच्या टेरेसवर तात्पुरत्या स्वरूपात तिसरा मजला बांधून देण्यासंदर्भात विनंती केली आहे. त्याअनुषंगाने पाहणी करून इमारतीच्या स्ट्रक्चरल स्टॅबीलिटीबाबत मे. के.बी.पी सिव्हील इंजिनिअर्स सर्व्हिसेस यांचेकडून पुढील प्रमाणे अहवाल प्राप्त झालेला आहे. Considering original structural design, reinforcement sizes, Grade of Concrete, aforesaid (Existing G+2Floors) building will be structurally suitable for construction of additional one floor (Using light weight Material only) after completion of suggested retrofitting works at all critical locations. सदर उपरोक्त प्राप्त निष्कर्षानुसार इमारतीचे तात्पुरत्या स्वरूपात विस्तारीकरण करणे शक्य आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभागांतर्गत पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तलयामधील स्थापत्य विषयक व अनुषंगिक कामे करणे या कामाचा समावेश सन २०२३-२४ मुळ अंदाजपत्रकात असून सदर कामास मा.प्रशासक तथा आयुक्त सो यांचे कडील दि.१३/०४/२०२३ रोजीच्या मंजूर प्रस्तावान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर मुळ देखभाल दुरूस्तीच्या कामांतर्गत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय इमारतीचे विस्तारीकरण |

| | |
|---|---|
| | करणे तसेच सदर कामाची व्याप्ती विचारात घेता मुळ अंदाजपत्रकीय रक्कमेत पुढीलप्रमाणे वाढ करणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अ. क्र. | कामाचे नाव | प्रभाग क्र. | लेखाशिर्ष | सन २०२२ -२३ चे | | कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत प्रशासकीय मान्यता रक्कम | सन २०२३ - २४ ची मुळ तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पान क्र. | अ.क्र. | | | |
| १ | पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयामधील स्थापत्य विषयक व अनुषंगिक कामे करणे. | १७ | भांडवली कामे | १०७ | १० | १०००००००० | ३५०००००० | १००० |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**ठराव क्रमांक -३३८** **विषय क्रमांक –३३८**

**दिनांक- १/०६/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३३८**<br>**दिनांक-१/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. नरवि/कावि/१६/७५/२०२३ दि.१/६/२०२३ अन्वये, नवलाख उंब्रे येथील ब्रेक प्रेशर टॅक (बी.पी.टी.) पासून देहूपर्यंत १४०० मि.मी. व्यासाची गुरुत्व नलिका टाकणेकामी जाधववाडी धरण क्षेत्रातील खाजगी क्षेत्रातून महाराष्ट्र शासन राजपत्र "सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४९ नुसार टाकणेसाठी जागेचे भूसंपादन करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३३८**<br>**दिनांक-१/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. नरवि/कावि/१६/७५/२०२३ दि.१/६/२०२३ अन्वये, आंद्रा व भामा आसखेड धरणातील पाणी आणणे योजना राबविणेसाठी पिपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत मे. डीआरए कन्सल्टंट लि. नागपूर यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर सल्लागार एजन्सीमार्फत भामा आसखेड धरणामधुन पिपरी चिंचवड महानगरापलिका क्षेत्रासाठी मौजे चिखली जलशुध्दीकरण केंन्द्रापर्यंत उदंचन (Rising Line) व गुरुत्व (Gravity Line) जलवाहिनी टाकणेचे प्रस्तावित करणेत आले आहे. सदर भामा आसखेड धरणामधुन पिपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी मौजे चिखली जलशुध्दीकरण केंन्द्रापर्यंत १७०० मी.मी. व्यासाची ८.८ कि.मी. लांबीची उदंचन जलवाहिनी (Rising Line) व १४०० मी.मी. व्यासाची १८.९० कि.मी. लांबीची गुरुत्व (Gravity Line) जलवाहिनी अशी एकूण २७.७० कि.मी. जलवाहिनी |

टाकणेचे नियोजन करणेत आले आहे. उक्त जलवाहिनी पिंपरी चिंचवड शहरातून व पिंपरी चिंचवड शहराबाहेरून टाकणेचे नियोजन असल्यामुळे पिंपरी चिंचवड शहराबाहेरून खेड आणि मावळ तालुक्यामधून टाकावयाचे ७.०६१ कि.मी. लांबीच्या जलवाहिनीसाठी जागा संपादनाबाबत मा. जिल्हाधिकारी, पुणे विभाग, पुणे यांचेकडे पत्र क्र. नरवि/कावि/१६/२७/२०२३, अन्वये दि. १०/०१/२०२३ रोजी प्रस्ताव सादर केला असून भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

प्रकरणी नवलाख उंब्रे येथील ब्रेक प्रेशर टँक (बी.पी.टी.) पासून देहूपर्यंत १४०० मि.मी. व्यासाची गुरुत्व नलिका जाधववाडी धरण क्षेत्रातील खाजगी जागेतून टाकणेचे काम हाती घेणेत आलेले आहे. सदर कामाच्या अडी-अडचणींबाबत मा. विभागीय आयुक्त, पुणे, यांचे अध्यक्षतेखाली दि. २५/०५/२०२३ रोजी आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पाबाबत झालेली बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने ज्या ठिकाणी खाजगी क्षेत्रातून जलवाहिनी टाकावी लागेल त्या ठिकाणी महाराष्ट्र शासन राजपत्र "सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४९" नुसार जलवाहिनी टाकणेकामी प्रस्ताव सादर करावा अशा सुचना दिल्या आहेत.

त्यानुसार खालील नमुद तक्त्यानुसार जलवाहिनी टाकणेकामी महाराष्ट्र शासन राजपत्र "सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४९" नुसार जागा ताब्यात घेणेबाबत मा. सहशहर अभियंता पाणीपुरवठा विभाग यांनी दि. ३१/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्ववये या विभागाकडे मागणी केली आहे.

| अ.क्र. | जलवाहिनीचा व्यास मि.मी मध्ये | स.नं./गट नं. | एकूण लांबी मी.मध्ये | आवश्यक रुंदी मी.मध्ये | अंदाजित क्षेत्र चौ.मी. | गावाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | १४००<br>चैनेज-<br>(२८०२ ते ५०४०) | १०५ ते १११<br>१४६ ते १४८<br>१५३ ते१५८<br>१७१, १<br>१७५ ते १८३ | २२३८ | ४.०० | ८९५२ | जाधववाडी (जाधववाडी धरण क्षेत्रातील खाजगी जागा) |

सदर पिपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीबाहेरील महानगरपालिका विकास आराखड्या व्यातिरीक्त वरीलप्रमाणे जाधववाडी, ता. मावळ, जि.पुणे या भागातील धरण क्षेत्रामधून १४०० मि.मी व्यासाची गुरूत्व (Gravity Line) जलवाहिनी टाकणेसाठी जागेचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. उक्त जलवाहिनीची जागा "महाराष्ट्र राज्यात सुविधा व सेवा (विद्युत तारमार्ग वगळता) देण्यासाठी भूमीगत नळमार्ग टाकण्याकरिता आणि भूमिगत वाहिन्या बांधण्याकरिता जमिनीमधील वापर हक्काचे संपादन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतुद करण्याकरिता सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९ च्या तरतुदीनुसार जागा संपादन करणेकरिता मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**ठराव क्रमांक -३३९** **विषय क्रमांक –३३९**

**दिनांक- १/०६/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३३९**<br>**दिनांक-१/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/२०२/२०२३ दि.१/६/२०२३ अन्वये, म.न.पा.जलतरण तलावाचे शुल्कामध्ये वाढ करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३३९**<br>**दिनांक-१/०६/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/२०२/२०२३ दि.१/६/२०२३ अन्वये, म.न.पा.जलतरण तलावाचे मिळणारे उत्पन्न व त्यावर होणारा खर्च यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत येत असल्याने ही तफावत कमी करण्यासाठी जलतरण तलाव शुल्कामध्ये खालील प्रमाणे वाढ करणेस मान्यता घेणे आवश्यक आहे. |

| अ.क्र. | तपशिल | दरमहा र.रु. | तिमाही दर र.रु. | वार्षिक दर र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | १२ ते ६० वयोगटातील सर्व नागरिक | ५००/- | १२००/- | ४५००/- |
| २ | १ व्यक्ती स्वतःसाठी गेस्ट तिकीट | प्रती दिन प्रती तास गेस्ट तिकीट र.रु.२०/- | | |
| ३ | लॉकर फी | - | ३००/- | १२००/- |
| ४ | नेहरूनगर जलतरण तलाव - सराव ,शिबिर अथवा स्पर्धा करिता सार्वजनिक संस्था, शाळा, कॉलेज,कंपनी ,क्लब यांना प्रती दिन प्रती १ तासाचे भाडे | | | २०००/- |
| ५ | इतर जलतरण तलाव - सराव ,शिबिर अथवा स्पर्धा करिता सार्वजनिक संस्था, शाळा, कॉलेज यांना प्रती दिन प्रती १ तासाचे भाडे | | | १५००/- |
| ६ | १२ वर्षाखालील मुले,म.न.पा.अधिकारी व कर्मचारी ,राष्ट्रीय खेळाडू ,पत्रकार,जेष्ठ नागरिक (६० वर्षावरील) यांना मासिक, त्रैमासिक, वार्षिक शुल्कामध्ये सर्वसाधारण शुल्काच्या ५० % सवलत राहील. ( दैनंदिन गेस्ट तिकीट मध्ये सवलत दिली जाणार नाही.) | | | |
| ७ | महानगरपालिका सदस्य ,खेळाडू दत्तक योजनेतील जलतरण खेळाडू , म.न.पा.शाळेतील विद्यार्थी खेळाडू ,दिव्यांग विद्यार्थी ,दिव्यांग नागरिक यांना सर्वसाधारण शुल्काच्या १०० % सवलत राहील.<br><br>( विनामुल्य ) | | | |

म.न.पा.चे एकूण १३ जलतरण तलाव आहेत.त्यांचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | क्षेत्रीय कार्यालय | जलतरण तलावाचे नाव | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अ | श्री.छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव, निगडी प्राधिकरण | निगडी प्राधिकरण |
| २ | अ | साई अॅक्वामरीन जलतरण तलाव,संभाजीनगर,चिंचवड | संभाजीनगर,चिंचवड |
| ३ | अ | राजर्षी शाहू महाराज जलतरण तलाव,मोहननगर चिंचवड | मोहननगर चिंचवड |
| ४ | ब | कै.वस्ताद बाळासाहेब गावडे जलतरण तलाव, केशवनगर, चिंचवड | केशवनगर,चिंचवड |
| ५ | क | कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम जलतरण तलाव,नेहरूनगर, पिंपरी | नेहरूनगर,पिंपरी |
| ६ | इ | कै.बाळासाहेब लांडगे जलतरण तलाव, भोसरी | भोसरी |
| ७ | इ | संत ज्ञानेश्वर महाराज जलतरण तलाव वडमुखवाडी, च-होली | वडमुखवाडी,च-होली |
| ८ | फ | यमुनानगर जलतरण तलाव, यमुनानगर, निगडी | यमुनानगर,निगडी |
| ९ | ग | खिंवसरा पाटील जलतरण तलाव,थेरगाव | थेरगाव |
| १० | ग | पिंपरी वाघेरे जलतरण तलाव,पिंपरी वाघेरे गाव | पिंपरी गाव |
| ११ | ह | कै.बाळासाहेब शितोळे जलतरण तलाव, सांगवी | सांगवी |
| १२ | ह | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जलतरण तलाव, कासारवाडी | कासारवाडी |
| १३ | ह | कै. काळूराम जगताप जलतरण तलाव, पिंपळे गुरव | पिंपळे गुरव |

मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७अ/कावि/२२१/२०१४ दि.३०/६/२०१४ अन्वये म.न.पा.विविध क्रीडा सुविधा दर पूर्वीप्रमाणे लागू करणेस मान्यता दिली असून त्यानुसार आदेशाचे तारखेपासून आजतागायत जलतरण तलाव दरपत्रक खालील प्रमाणे आकारले जात आहे.

| अ.क्र. | तपशिल | तिमाही दर र.रु. | सहामाही दर र.रु. | वार्षिक दर र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | १२ वर्षाखालील मुले /मुली | २००/- | ३५०/- | ५००/- |
| २ | १२ वर्षावरील व्यक्ती | ४००/- | ७००/- | १०००/- |
| ३ | अपंग,म.न.पा.कर्मचारी स्वतः,राज्य राष्ट्रीय,अंतर राष्ट्रीय खेळाडू ,जेष्ठ नागरिक पत्रकार | २००/- | ३५०/- | ५००/- |
| ४ | लॉकर फी | ५०/- | ७५/- | १००/- |
| ५ | १ व्यक्तीसाठी,स्वतःसाठी गेस्ट तिकीट | प्रती दिन गेस्ट तिकीट र.रु.१०/- | | |

म.न.पा.जलतरण तलावाचे मिळणारे उत्पन्न व त्यावर होणारा खर्च यामध्ये मोठ्या

प्रमाणात तफावत येत असल्याने ही तफावत कमी करण्यासाठी जलतरण तलाव शुल्कामध्ये खालील प्रमाणे वाढ करणे आवश्यक आहे .

| अ.क्र. | तपशिल | दरमहा र.रु. | तिमाही दर र.रु. | वार्षिक दर र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | १२ ते ६० वयोगटातील सर्व नागरिक | ५००/- | १२००/- | ४५००/- |
| २ | १ व्यक्ती स्वतःसाठी गेस्ट तिकीट | प्रती दिन प्रती तास गेस्ट तिकीट र.रु.२०/- | | |
| ३ | लॉकर फी | - | ३००/- | १२००/- |
| ४ | नेहरूनगर जलतरण तलाव - सराव ,शिबिर अथवा स्पर्धा करिता सार्वजनिक संस्था, शाळा, कॉलेज,कंपनी ,क्लब यांना प्रती दिन प्रती १ तासाचे भाडे | | | २०००/- |
| ५ | इतर जलतरण तलाव - सराव ,शिबिर अथवा स्पर्धा करिता सार्वजनिक संस्था, शाळा, कॉलेज यांना प्रती दिन प्रती १ तासाचे भाडे | | | १५००/- |
| ६ | १२ वर्षाखालील मुले,म.न.पा.अधिकारी व कर्मचारी ,राष्ट्रीय खेळाडू ,पत्रकार,जेष्ठ नागरिक (६० वर्षावरील) यांना मासिक, त्रैमासिक, वार्षिक शुल्कामध्ये सर्वसाधारण शुल्काच्या ५० % सवलत राहील. ( दैनंदिन गेस्ट तिकीट मध्ये सवलत दिली जाणार नाही.) | | | |
| ७ | महानगरपालिका सदस्य,खेळाडू दत्तक योजनेतील जलतरण खेळाडू, म.न.पा.शाळेतील विद्यार्थी खेळाडू,व्यांग विद्यार्थी,दिव्यांग नागरिक यांना सर्वसाधारण शुल्काच्या १०० % सवलत राहील. ( विनामुल्य ) | | | |

वरील प्रमाणे, म.न.पा.जलतरण तलावाचे शुल्कामध्ये वाढ करणेस मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**ठराव क्रमांक -३४०** **विषय क्रमांक –३४०**

**दिनांक- १/०६/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

**विषय क्रमांक-३४०**
**दिनांक-१/०६/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.लेखा/२८/कावि/१०/२०२३ दि.१/६/२०२३ अन्वये, स्थानिक निधी लेखा परिक्षण सन २०१६-१७ ते २०१७-१८ बाबत संक्षिप्त माहिती पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या विविध विभागाकडील सन २०१६-१७ ते २०१७-१८ मधील स्थानिक निधी लेखा परिक्षा नवी मुंबई – ४००६१४ यांचेकडील लेखा परिक्षण अहवालाबाबत.

**ठराव क्र. ३४०**
**दिनांक-१/०६/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.लेखा/२८/कावि/१०/२०२३ दि.१/६/२०२३ अन्वये, मा.सहसंचालक (म.न.पा.ले.प.) स्थानिक निधी लेखा परिक्षण रायगड भवन, सातवा

| | |
|---|---|
| | मजला, नवी मुंबई- ४००६१४ यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांचे सन २०१६-१७ ते सन २०१७-१८ या कालावधीचे लेखापरिक्षण पूर्ण केलेले असून त्यांनी त्यांचे अहवालामध्ये एकत्रित २११ परिच्छेद उपस्थित केले आहेत. सदर अहवाल व त्यातील परिच्छेदांचे प्राप्त अनुपालन अवलोकनार्थ ठेवले आहे.<br>महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम १०(१) अन्वये मा.सहसंचालक (म.न.पा.ले.प.) स्थानिक निधी लेखा परिक्षा, नवी मुंबई यांचेकडील अनुपालन पूतर्ता अहवाल सादर करणेकामी मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**